महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल: cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

जावक क्रमांक – १०१/३४८९६१०

दिनांक :- १५ ऑक्टोबर २०२६

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा मुंबई मंडळाची बेकायदेशीर बांधकामांविरुद्ध कारवाई तीव्र

**गोरेगाव येथील अनधिकृत बांधकाम प्रकरणी विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल; निष्कासन कारवाईनंतर कायदेशीर कारवाईचाही बडगा**

मुंबई, दि. १५ ऑक्टोबर २०२६ : म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत म्हाडाच्या जमिनीवरील बेकायदेशीर बांधकामांविरुद्ध कारवाई तीव्र करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत गोरेगाव येथील सुभाषनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या वरील तीन मजल्यांवर करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाप्रकरणी संबंधित विकासकाविरुद्ध गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई मंडळाच्या कार्यक्षेत्रातील म्हाडाच्या जमिनीवर बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील लागू तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. गोरेगाव येथील सुभाषनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या तळमजला अधिक २२ मजली इमारतीमध्ये म्हाडा मुंबई मंडळाची आवश्यक परवानगी न घेता वरील तीन मजल्यांवर एकूण १२ सदनिकांचे बेकायदेशीर बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणी संबंधित विकासक विकास अरविंद सुरती यांचे विरुद्ध कायद्यानुसार नोटीस बजावणे, सुनावणी घेणे आणि आदेश पारित करणे ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर २८, २९ आणि ३० सप्टेंबर २०२६ रोजी सदर बेकायदेशीर बांधकामाचे निष्कासन करण्यात आले. या निष्कासन कारवाईसाठी झालेला खर्चही संबंधित विकासकाने मुंबई मंडळाला अदा केलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे. बेकायदेशीर बांधकामाचे स्वरूप, त्याची व्याप्ती आणि प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेऊन संबंधित विकासकाविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील लागू तरतुदींनुसार गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

म्हाडा मुंबई मंडळाच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत आगामी काळात मुंबईतील विविध परिसरांमध्ये बेकायदेशीर बांधकामांविरुद्ध कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे. यामध्ये गोरेगावमधील सिद्धार्थनगर, मोतीलाल नगर, वाकोला येथील आनंद नगर, विक्रोळीतील टागोर नगर, अंधेरीतील एस. व्ही. पी. नगर तसेच बोरिवली कार्यक्षेत्रातील गोराई आणि चारकोप या परिसरांचा समावेश आहे. या परिसरांमध्ये वारंवार बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या व्यक्तींच्या प्रकरणांची तपासणी करून, उपलब्ध वस्तुस्थिती आणि लागू कायदेशीर तरतुदींच्या आधारे पात्र प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. म्हाडाच्या जमिनीवरील नागरिकांनी म्हाडाच्या सक्षम प्राधिकरणाची आवश्यक पूर्वपरवानगी व मंजुरी घेतल्याशिवाय कोणतेही नवीन बांधकाम करू नये अथवा मंजूर बांधकामात अनधिकृत वाढ करू नये, असे आवाहन मुंबई मंडळामार्फत करण्यात येत आहे. बेकायदेशीर बांधकाम आढळल्यास संबंधित बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात येऊ शकते. तसेच, लागू कायदेशीर तरतुदींनुसार संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाईही होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी बांधकामासंबंधीच्या नियमांचे पालन करून म्हाडा प्रशासनास सहकार्य करावे.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---